# सायबर कीर्तनातून जनजागृती  खंडेलवाल महाविद्यालयाचा अभिनव प्रयोग

अकोट – नुकताच श्री संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या ५७७ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त संत सेना महाराज भवन, अकोट रोड, अकोला येथे शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील विद्यार्थ्यांनी विशेष जनजागृती कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात कीर्तनाच्या पारंपरिक धाटणीचा वापर करून सायबर गुन्ह्यांविषयी लोकजागृती करण्यात आली. हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन, पुणे व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जात असणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानांतर्गत पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समन्वयक प्रा. डॉ. दीप्ती पेठकर यांच्या सहकार्याने सायबर वॉरियर्स विद्यार्थी मंडळाने हा उपक्रम सादर केला. सायबर क्लब सेक्रेटरी प्रणाली पिंपळकर, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर पूर्वा ताथे, मीडिया डायरेक्टर अनिकेत फुके यांच्या नेतृत्वाखाली सायबर वॉरियर्स विद्यार्थी सुमित सपकाळ, यश भालेराव, ओम गुजर, आदित्य गोतमारे, साक्षी शिरसाट, प्रणाली दवणे, चंचल निंबाळकर, ईश्वरी मोकळकर, हर्षा बिहाडे, साक्षी फाटकर, चंदना तक्के, सिया अग्रवाल, तनुजा घोगरे अदिती जानोरकर, दर्शना वाघेला, व गायत्री मोडके यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी नागरिकांना सायबर सुरक्षिततेचे सोपे मंत्र दिले  पासवर्ड व ओटीपी कुणाशीही शेअर करू नयेत, अज्ञात लिंकवर क्लिक करू नयेत, बँक वा ग्राहक सेवा नावाखाली होणाऱ्या फसवणूक कॉलपासून सावध राहावे, सोशल मीडियावर फोटो वा वैयक्तिक माहिती शेअर करताना विचारपूर्वक वागावे.

पूर्वी डाकू तलवारी घेऊन लुटायचे, आता मोबाईल घेऊन लुटतात. या उदाहरणातून विद्यार्थ्यांनी आधुनिक काळातील सायबर चोरीचे वास्तव स्पष्ट केले. तर सायबर जग भारी, सावधगिरी खरी या ओवीवर सभागृह दुमदुमून गेला या आगळ्या–वेगळ्या प्रयोगामुळे नागरिकांमध्ये उत्सुकता आणि आनंद निर्माण झाला. गंमती–जंमती, भजनी सूर आणि ओव्यांच्या माधुर्यातून दिलेला गंभीर संदेश प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवून गेला. मनोरंजनासोबत ज्ञानही मिळाले, त्यामुळे संदेश लक्षात राहिला, असा प्रतिसाद उपस्थितांनी दिला. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर वाढला आहे. त्याचबरोबर ऑनलाईन फसवणुकीचे प्रमाणही वाढले आहे. नागरिकांना योग्य मार्गदर्शन व सजगता मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर सायबर गुन्ह्यांपासून बचाव होऊ शकतो. यासाठीच या प्रकारचे उपक्रम महत्त्वाचे ठरतात. कीर्तनासारख्या लोकाभिमुख परंपरेतून दिलेला संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचतो. या उपक्रमातून सायबर वॉरियर्स विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी सजगता निर्माण केली. ज्ञान व मनोरंजनाचा मेळ घालून सादर केलेला हा कार्यक्रम समाजहिताचा ठेवा ठरला.